N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म -

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** कोल्हापुर **P.S.(ठाणे):** वडगांव **Year (वर्ष):** 2019

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0314 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 08/06/2019 02:25 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** दरमियानी दिन

**Time Period (कालावधी):**

**Date From (दिनांक पासून):** 06/06/2019

**Date To ( दिनांक पर्यंत):** 07/06/2019

**Time From (वेळेपासून):** 13:51 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 17:15 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 08/06/2019 **Time (वेळ):** 01:30 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

**Entry No. (नोंद** 002 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 08/06/2019 01:30 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्तळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** पश्चिम, 1 किमी

**Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** वडगांव एसटीस्टण्ड परिसर ,हातकणंगले

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नांव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** श्री.मारूती पांडुरंग पाटील

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती का नाव)**

(c) **Date/Year of Birth (जन्म** 1966 **(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (अदा केल्याची तारीख):**

**Place of Issue (अदा केल्याची ठिकाण):**

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

(h) **Address** (पत्ता):

| **S.No.**(अ. क्र.) | **Address Type** (पत्याचा प्रकार) | **Address** (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | भादोले पैकी खोडवे मळा,हातकणंगले,वडगांव ,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | भादोले पैकी खोडवे मळा,हातकणंगले,वडगांव ,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.): **Mobile** (मोबाइल नं.): 91-8551819426

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| **S.No.** (अ.क्र.) | **Name** (नाव) | **Alias** (उर्फनाव) | **Relative's Name** (नातेवाईकाचे नाव) | **Present Address** (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री.राजाराम धोंडीराम पावसकर | | | 1. श्रीपिसे यांचे घरी,वडगांव एसटी,स्टन्डचे मागे,हातकमंगले,वडगांव ,कोल्हापुर, महाराष्ट्र,भारत<br>2. गांधीनगर, ,आजरा,आजरा,आजरा, कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| **S.No.** (अ.क्र.) | **Property Category** (मालमत्ता वर्ग) | **Property Type** (मालमत्ता प्रकार) | **Description** (वर्णन) | **Value(In Rs/-)** (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)-**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11 **Inquest Report / U.D. case No., if any** (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| **S.No.** (अ. क्र.) | **UIDB Number** (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents** (प्रथम सूचना तथ्य ):

फिर्याद दिनांक - 08/06/2019 मी श्री.मारुती पांडूरंग पाटील,वय-53,व्यवसाय-शेती,रा.भादोले,ता.हातकणंगले,जि.कोल्हापूर, मोबाईल नंबर-8551819426, समक्ष फिर्याद देतो की, मी वरील पत्त्यावर माझे कुटूंबासह एकत्रित राहणेस आहे. मी व माझे कुटूंब शेतीवर उपजिवीका करतो. दिनांक 06/06/2019 रोजी अन्टी करप्शन ब्युरो,कोल्हापूर येथील कार्यालयामध्ये जावून पोलीस उपअधीक्षक श्री.गोडे सा ो यांची प्रत्यक्ष भेट घेतली व वडगाव पोलीस ठाणेतील बीट अंमलदार पावसकर यांचेविरुध्द लाच मागणीबाबत माझी तक्रार असलेचे सांगून लाच मागणीचे अनुषंगाने त्यांचेविरुध्द कारवाई होणेकरीता माझा तक्रारी अर्ज श्री.गोडे सा ो यांचेकडे दिला. त्या अर्जातील मजकूर असा की, मी वरील पत्त्यावर माझे कुटूंबिय एकत्रित राहाणेस आहे. मी शेती व्यवसाय करतो व शेतामधील घरामध्ये राहाणेस आहे. माझे भाऊ श्री.विश्वास शंकर पाटील हे त्यांचे कुटूंबियासह भादोले गावामध्ये राहाणेस आहेत. माझे शेत व माझा भाऊ श्री.विश्वास शंकर पाटील यांचे शेत भादोले गावचे हद्दीत आहे. आमचे शेतामध्ये बांध आहे. सदर बांधाचे कारणावरुन माझे व माझे भावाचा मुलगा यांचेत दि.02/06/2019 रोजी दुपारी वादावादी झाली. त्याबाबत माझे भाऊ श्री.विश्वास पाटील यांनी माझे व माझे दोन मुलांचेविरुध्द वडगांव पोलीस ठाणे येथे त्याचदिवशी तक्रार दिली आहे. सदर तक्रारीचे अनुषंगाने दि.04/06/2019 रोजी वडगांव पोलीस ठाणे येथील बीट अंमलदार श्री.पावसकर यांनी मला पोलीस ठाणेस बोलाविलेचा निरोप दिला होता. म्हणून मी रात्री 8.00वा.चे सुमारास वडगांव पोलीस ठाणे येथे गेलो व बीट अंमलदार श्री.पावसकर यांना भेटलो. त्यावेळी त्यांनी माझे व मुलांचेविरुध्द तुमचे भाऊ श्री.विश्वास पाटील यांची तक्रार आलेली असून त्यामध्ये तुम्हाला व मुलांना शिक्षा होवू शकते. तुमचेविरुध्द गुन्हा दाखल करावयाचा किंवा नाही हे माझे े हातात आहे. सदर तक्रारीनुसार कारवाई न करता ती मिटवून घ्यायची असेल तर रु. 10,000/-द्या, मी तक्रार मिटवितो असे म्हणाले. तेव्हा मी त्यांना यामध्ये माझी काही चुकी नाही. आमचे शेतामधील बांधाची पाहाणी करणेसाठी तुम्ही या असे सांगितले. त्यावर ते ठिक आहे, मी येतो असे म्हणाले होते. काल दि.05/06/2019 रोजी सकाळी 11.30वा.चे सुमारास बीट अंमलदार श्री.पाबसकर हे माझे भावासमवेत आमचे परस्पर शेतात येवून बांधाची जागा बघून गेले. परंतू त्यांनी मला सदर ठिकाणी बोलाविले नाही. ते शेताचे बांधाची पाहाणी करुन गेल्याचे मला माहीती नसलेने मी बीट अंमलदार श्री.पावसकर यांना त्यांचे मोबाईल फोनवर फोन केला असता त्यांनी मी काल येवून शेतातील बांध बघून गेलो आहे. मला वेळ नसलेने मी तुम्हास बोलाविले नाही. तुम्ही उदईक दि.06/06/2019 रोजी सकाळी 11.00वा.नंतर मला फोन करुन भेटावयास या असे सांगितले आहे.माझे व माझे भावाचा मुलगा याचेत आमचे शेतातील बांधाचे कारणावरुन झालेल्या वादावादी बाबत वडगांव पोलीस ठाणे येथे माझा भाऊ श्री.विश्वास पाटील यांनी तक्रार दिलेली आहे. सदर तक्रारीनुसार

कारवाई न करता ती मिटवून घ्यायची असेल तर रु.10,000/-द्या, मी तक्रार मिटवितो असे सांगून बीट अंमलदार श्री.पावसकर यांनी माझेकडे लाच मागणी केली आहे. परंतू त्यांना लाच देणेची माझी ईच्छा नाही. तरी त्यांचेविरुध्द आपलेकडून योग्य ती कारवाई होणेस विनंती आहे. बीट अंमलदार श्री.पावसकर व माझेत कोणताही देणेघेणेचा व्यवहार नसून त्यांचेत व माझेत वादविवाद नाही. श्री.पावसकर यांना लाच म्हणून देणेसाठी मी.माझेकडील शिलकीतून रक्कम हजर करणार आहे. तरी त्यांचेवर आपणाकडून पुढील कारवाई होणेस विनंती आहे ---अषा मजकूराची तक्रार आहे. माझा तक्रारी अर्ज श्री.गोडे सा◌ो यांनी वाचून पाहीलेवर मला माझी तक्रार पंचांना सांगणेची सुचना दिली. त्याप्रमाणे मी माझी तक्रार पंचांना सांगितली. त्यानंतर श्री.गोडे सा◌ो यांनी माझी लेखी तक्रार पंचांना वाचावयास दिली. मी सांगितलेली तोंडी तक्रार व लेखी तक्रार एकच असलेची पंचांची खात्री झाली. त्यानंतर श्री.गोडे सा◌ो यांचे सुचनेनुसार दोन्ही पंच्चांनी माझे लेखी तक्रारीखाली सह्या केल्या. तसेच गोडे सा◌ो यांनी देखील तक्रारीखाली सही केली.श्री.गोडे सा◌ो यांनी मला व दोन्ही पंचांना बीट अंमलदार पावसकर माझेकडे लाचेची मागणी करतात अगर कसे? याबाबत प्रथम पडताळणी करणार आहोत असे सांगितले. श्री गाडेसो यांनी मला तुम्ही आमचे कार्यालयाकडे येताना कसे आला आहात? याबाबत विचारणा करता, त्यांनी मी माझेकडील मोटर सायकलने आपले कार्यालयाकडे आलेचे सांगितले. तेव्हा श्री गोडेसो यांनी आम्ही,दोन्ही पंच व स्टाफ असे पेठवडगांव गावी जाणेसाठी आमचे कार्यालयाकडील शासकीय टाटा सुमो गाडीद्वारे येतो. तुम्ही पेठवडगांवमध्ये आम्हास कोठे भेटता? याबाबत.विचारता त्यांना मी पेठवडगांव येथील शेती उत्पन्न बाजार समितीचे आवारात भेटतो असे सांगितले. त्यानंतर मी माझेकडील हिरो होंडा सीडी.डान मोटर सायकल नंबर -डभ्.09ध्ात्.4127 यावरुन पेठवडगांव येथील शेती उत्पन्न बाजार समितीचे आवारात गेलो. तेथे श्री गोडेसो माझो अगोदर येवुन थांबले होते त्यांनी मला आपले गाडीजवळ बोलावून गाडीमध्ये बसवून घेतले.त्यानंतर माझेबरोबर पंच श्री पाटोळे यांना बीट अंमलदार पावसकर यांची भेट घेण्यासाठी जावे अशी श्री.गोडे यांनी सुचना दिली. आमची बीट अंमलदार पावसकर यांचेशी भेट झालेवर आम्ही गोडे सा◌ो थांबलेल्या ठिकाणी येवून त्यांना भेटावे अशी त्यांनी आम्हास सांगितले. त्यानंतर गोडे सा◌ो यांनी त्यांचे कार्यालयाकडील डिजीटल व्हाईस रेकार्डरमध्ये नवीन डडब्ात्क्◌ै कंपनीचे 8 जीबीचे मायक्रो एसडी कार्ड घालुन त्यामध्ये पुर्वीचे कोणत्याही प्रकारचे संभाशण ध्वनिमुद्रीत नसल्याची माझी व पंचांची खा◌◌◌त्री करून दिली. मला पंचासमक्ष डिजीटल व्हाईस रेकार्डर चालू बंद करणेचे प्रात्यक्षिक दाखविले. तेंव्हा श्री.गोडे सा◌ो यांनी मला तसेच पंच श्री पाटोळे यांना पडताळणी कारवाईबाबत योग्य त्या सुचना दिल्या.श्री गोडेसो यांनी डिजीटल व्हाईस रेकार्डर 13.51 वा.चालू करुन तो माझ्या गळयात शर्टाचे आतील बाजुस दोरीच्या सहायाने अडकवून दिला व मला आणि पंच श्री.पाटोळे यांना माझेकडील मोटर सायकलवरुन पेठवडगांव पोलीस ठाणे येथे बीट अंमलदार पावसकर यांची भेट घेणेकरीता पाठविले. तेथे मी बीट अंमलदार पावसकर यांची भेट घेवून पेठवडगांव येथील शेती उत्पन्न बाजार समितीचे आवारात गोडे सा◌ो थांबलेल्या ठिकाणी परत आलो. तेव्हा त्यांनी माझेकडील डिजीटल व्हाईस रेकार्डर घेवून तो त्यांनी 14.50 वा. बंद करुन ताब्यात घेतला.आम्ही वडगाव पोलीस ठाणे येथे जावून बीट अंमलदार पावसकर यांची भेट घेवून त्यांचेशी माझे कामाबाबत चर्चा केली असता, बीट अंमलदार पावसकर यांनी माझे भावाचा मुलगा व आमचेत शेतातील बांधाचे कारणावरुन झालेल्या वादावादी बाबत वडगांव पोलीस ठाणे येथे माझा भाऊ श्री.विश्वास पाटील यांनी दिलेल्या तक्रारीनुसार दाखल झालेल्या अदखलपात्र गुन्हयात कारवाई न करता ती मिटवून घेणेकरीता रु.10,000/- लाचेची मागणी करून तडजोडीअंती रू.5,000/-पैसे स्विकारण्यास मान्यता दिली. तेथून आम्ही सर्वजन एसीबी कार्यालय, कोल्हापूर येथे आलेवर श्री.गोडे सा◌ो यांनी डिजीटल व्हाईस रेकार्डरमध्ये ध्वनिमुद्रीत झालेले आवाज माझे व पंच श्री पाटोळे यांचे मदतीने ओळखून ऐकले. तसेच पोका देसाई यांनी माझे व पंच श्री पाटोळे यांचे मदतीने ध्वनिमुद्रीत संभाषण ऐकूण त्यांची स्क्रिप्ट तयार केली. त्यावेळी आपण डिजीटल व्हाईस रेकार्डरमधील मेमरी कार्ड जप्त करुन ताब्यात घेतले व ते सिलबंद केले. नमुद कारवाईबाबत श्री.गोडे सा◌ो यांनी दि.06/06/2019 रोजी सविस्तर पडताळणी पंचनामा केला आहे.पडताळणीवेळी बीट अंमलदार पावसकर यांनी दुस-यादिवषी मी फोन करतो म्ग तुम्ही या असे मला सांगितले होते. त्याप्रमाणे आज दिनांक 7/6/2019 रोजी मी बीट अंमलदार पावसकर यांचे फोनची वाट पाहीली. परंतू त्यांनी मला फोन केला नाही. म्हणून मी श्री गोडेसो यांना बीट अंमलदार यांना फोन करू का असे विचारले असता त्यांनी आम्ही वडगाव षेती उत्पन्न बाजार समिती, पेठवडगाव येथे येतो. त्यांनतर फोन करा असे सांगितले. थोडया वेळानंतर मी वडंगाव षेती उत्पन्न बाजार समिती, पेठवडगाव येथे गेलो असता तेथे श्री.गोडे सो, पंच श्री पाटोळे व श्री.गुरव तसेच त्यं◌ाचे सोबतचा स्टाफ असे त्यांचेकडील शासकीय सुमो गाडीतून थांबून होते. त्यांनतर मी त्यांचेजवळ गेलेनंतर बीट अंमलदार पावसकर यांना फोन लावून तक्रारी बाबत चर्चा केली असता त्यांनी मला वडगांव एस टी स्टडवर भेटण्यास सांगितले. तेथे गोडे सा◌ो यांनी मला गाडीमध्ये बोला◌ावून घेतले व सापळा पुर्व पंचनामा सुरु करीत असले◌ेचे सांगितले. त्यावेळी मला गोडे सा◌ो यांनी बीट अंमलदार पावसकर यांना देणेसाठीची लाच रक्कम हजर करणेस सांगितले. त्यावेळी मी माझेकडे उपलब्ध असलेले रु.2,000/-दराच्या 2 नोटा, रु.500/-दराची 1 नोट व रु.100/-दराच्या 5 नोटा मिळून रु.5,000/- लाच म्हणून देणेसाठी हजर केले. त्यामधील नोटांचे नंबर्स लिहून घेवून त्या नोटांना गोडे सा◌ो यांचे गाडीमधील मधील सिटवर पांढरा कागद अंथरुन त्यावर लाच रक्कमेंतील नोटा ठेवून त्यावर पोका पाटील यांचेमार्फत अन्थ्रासिन पावडर लावून घेतली व गाडीमध्ये काळे कापडाचे साहायाने अंधार करुन नोटांची अल्ट्राव्हायोलेट बटरीचे सहायाने मला व पंचांना तपासणी करुन दाखविली. त्यावेळी लाच रक्कम रु. 5,000/- माझ्या षर्टच्या डावे बाजूस असले खिषामध्ये पोका पाटील यांनी ठेवली. तसेच मला, दोन्ही पंच व सापळा पथकातील कर्मचायांना सापळ्याचे अनुषंगाने गोडे सा◌ो यांनी योग्य त्या सुचना दिल्या. त्यानंतर श्री.गोडे सा◌ो यांनी डिजीटल व्हाईस रेकार्डर दुपारी 16.50वा. चालु करुन तो माझ्या गळयात शर्टाचे आतील बाजुस दोरीच्या सहायाने अडकवून दिला व मला व पंच श्री पाट़ोळे यांना माझेकडील मोटर सायकलवरुन वडगांव एस टी स्टड येथे बीट अंमलदार पावसकर यांची भेट घेणेकरीता पाठविले. आम्ही वडगाव एस टी स्टडजवळ गेल्यावर रोडजवळ कडेला मोटर सायकल थांबविली. तेव्हा श्री गोडेसो, पंच व त्यांचे सोबतचा स्टाफ असे षासकीय गाडीतून उतरून स्टडच्या परिसरात थांबुन राहीले. मी बीट अंमलदार पावसकर यांना वडगांव एस टी स्टडवर आलेचे सांगितले. थोडयाच वेळात बीट अंमलदार पावसकर आले त्यांचेत व माझेत आमचे कामाबाबत चर्चा झाली. त्यावेळी बीट अंमलदार पावसकर यांनी माझेकडून लाच रक्कम रु. 5,000/- स्विकारली. त्यावेळी मी बीट अंमलदार पावसकर यांनी लाच रक्कम स्विकारलेबाबत इशारा केला असता आपण बीट अंमलदार पावसकर यांना पकडले आहे. त्यांनतर मला श्री गोडेसो यांनी वडगाव पोलीस ठाणे येथे येण्यास सांगितले. मी वडगांव पोलीस ठाणे येथे पोहचलो असता श्री गोडेसो व त्यांचे सोबतचा स्टाफ यांनी बीट अंमलदार पावसकर यांना घेवुन गाडीतून तेथे आले. सदर ठिकाणी गोडे सा◌ो बीट अंमलदार पावसकर यांचे कब्जातून मिळालेली लाच रक्कम रु.5,000/- जप्त केली. त्यावेळी बीट अंमलदार पावसकर यांचे नाव -श्री राजाराम धोंडीराम पावसकर पोलीस नाईक ब.नं.528 वडगांव पोलीस ठाणे असे असले◌ेचे समजले. सदर प्रकरणाबाबत गोडे सा◌ो यांनी दि. 07/06/2019 रोजी सविस्तर सापळा पंचनामा केला असून पंचनाम्याप्रमाणे मुद्देमाल जप्त केला आहे. एकंदरीत बीट अंमलदार पावसकर यांनी माझे भावाचा मुलगा व आमचेत शेतातील बांधाचे कारणावरुन झालेल्या वादावादी बाबत वडगांव पोलीस ठाणे येथे माझा भाऊ श्री.विश्वास पाटील यांनी दिलेल्या तक्रारीनुसार दाखल झालेल्या अदखलपात्र गुन्हयात कारवाई न करता ती मिटवून घेणेकरीता रु.10,000/- लाचेची मागणी करून तडजोडीअंती रू.5,000/-पैशाची मागणी केली. तसेच आज दि.07/06/2019 रोजी नमुद काम करुन देणेसाठी बीट अंमलदार पावसकर यांनी वडगांव एस टी स्टड आवारात माझेकडून रु.5,000/- लाच रक्कम स्विकारली असता त्यांना अन्टी करप्शन ब्युरो,कोल्हापूर येथील पोलीस उपअधीक्षक श्री.गोडे व त्यांचे स्टाफने पकडले आहे. तरी नमूद प्रकरणी माझी श्री राजाराम धोंडीराम पावसकर पोलीस नाईक ब.

नं.528 वडगांव पोलीस ठाणे यांचेविरुध्द लाचेची मागणी करून स्विकारल्याबाबत फिर्याद आहे.

13.**Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at** **(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

(1) **Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** PRADEEP SHIVAJI KALE(I (Inspector)) / PBMH75621 **or**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे** **Rank (पद):**

**No.(क्र.):** **to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार**

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

(4) **Transferred to P.S.(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):**

**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)**

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**

14.**Signature/Thumb impression of the complainant / informant.(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

15.**Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

**Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची**

**Name (नांम):** PRADEEP SHIVAJI KALE
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** PBMH75621